# प्रेस नोट

## ओशिवरा पोलीस ठाणे गुरक्र १०२२/२६ कलम १०३(१) हा गुन्हा उघडकिस आणले बाबत

दिनांक १४/०७/२०२६ रोजी सायंकाळी ०७:२० वा.चे. सुमारास आदर्श नगर , अस्ट्रर बिल्डींग च्या समोर, जोगेश्वरी पश्चिम मुंबई येथे एक ३० ते ३५ वर्षे महिला जखमी अवस्थेत पडले बाबत उत्तर नियंत्रण कक्ष येथून संदेश प्राप्त झाला. त्या अनुशंगाने सदर ठिकाणी ओशिवरा बीट मार्शल ०४ वर कर्तव्यावर असणारे पोलीस शिपाई/१४-२५१७ आकाश बागल यांनी जावून पाहिले असता सदर महिला जखमी अवस्थेत पडलेली असून तिच्या गळयाला जखम होवून त्यातून रक्त स्त्राव होत असल्याचे दिसून आले. सदर महिलेस तेथील लोकांनी ओळखून तिचे नाव झुमरी धिरज पवार असे सांगून तिला तिच्या नवऱ्याने धारधार हात्याराने वार करुन पळून गेल्याचे सांगितले. तात्काळ पोलीस शिपाई क्र १४-२५१७ आकाश बागल यांनी ओशिवरा निर्भया वहानातून जखमी महिलेस ट्रामा केअर हॉस्पीटल येथे उपचारा साठी नेले. तेथील डॉक्टरांनी तिला तपासून दाखलपूर्व मयत घोषित केले. सदर प्रकरणी चौकशीमध्ये मयत महिला हिचे नाव झुमरी धिरज पवार वय अंदाजे ३५ वर्षे असे असून तिला तिचा पति नामे धिरज कलेक्टर पवार वय ३५ वर्षे याने किरकोळ आपसी भांडणाचे रागातून घरातील चाकूने गळयावर वार करुन जखमी करुन खून केल्याचे आढळून आले. सदर प्रकरणी ओशिवरा पोलीस ठाणे गुरक्र १०२२/२६ कलम १०३(१) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे तपासमध्ये ओशिवरा पोलीस ठाण्याचे विविध तपास पथके तयार करुन तात्कळ आरोपी धिरज कलेक्टर पवार वय ३६ वर्षे धंदा बिगारी काम रा.ठी. आदर्श नगर, झोपडपट्टी, जोगेश्वरी पश्चिम मुंबई यास बेहरमबाग येथून ताब्यात घेवून दिनांक १५/०७/२६ रोजी ०४:२० वा. चे सुमारास अटक करण्यात आली. सदर गुन्हयाचा पुढील तपास ओशिवरा पोलीस ठाण्याकडून करण्यात येत आहे.

सदरची कामगीरी ही ओशिवरा विभाग सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. चंद्रकांत काटकर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री संजय चव्हाण, पोलीस निरीक्षक सचिन पाटील, सपोनि दिपक खराडे, पोउनि उदागे, पोहवा ०६०४०१/सिध्दार्थ भंडारे, पोहवा ०६११३७/धंनजय जगदाळे, पोहवा ०९००६७/ विनोद राठोड, पोहवा ०५०९०१/ आनंद पवार, पोशि १४१८८३/ अजित बंगड, पोशि ११०६४५/ विठ्ठल सकट व पो.शि क्र. १४-२५१७ आकाश बागल यांनी पार पाडली.